सेवाग्राम, जिल्हा वर्धा या ठिकाणी ग्रामोद्योग, कुटिरोद्योग व हस्तकला यांना प्रोत्साहन देण्यासाठी संसाधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी गठित केलेल्या उच्च स्तरीय समितीस मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-केव्हीबी-२०१५/प्र.क्र.२४४/उद्योग-६,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- ६ जानेवारी , २०१६.

वाचा :- १) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक-केव्हीबी- २०१५/ प्र.क्र.२४४/ उद्योग-६, दिनांक २६ ऑगस्ट, २०१५.
२) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक-केव्हीबी-२०१५/प्र.क्र.२४४/ उद्योग-६, दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१५.
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांचे क्र.कार्यासन-७/१९५७, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१५ चे पत्र.

शासन निर्णय :-

उपरोक्त वाचा येथील दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ व दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये डॉ. विनय सहस्त्रबुध्दे यांच्या अध्यक्षतेखाली एकूण २१ सदस्य यांची उच्च स्तरीय समिती गठीत करण्यात आलेली आहे.

२. सदर समितीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारांचा अंगीकार करत सेवाग्राम जिल्हा वर्धा या ठिकाणी ग्रामोद्योग, कुटिरोद्योग व हस्तकला यांना प्रोत्साहन देण्यासाठी संसाधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठीचा अहवाल ३ महिन्यात सादर करावयाचा असून, सदर कालावधी संपुष्टात येत आहे. तथापि, सदर समितीला प्रस्तुत प्रकरणी अहवाल तयार होणेकामी अधिक विचारविनिमय आवश्यक असल्याने समितीस २ महिन्याची मुदतवाढ मिळणेबाबत समितीचे अध्यक्ष यांच्या सूचनेनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांनी शासनास कळविले आहे.

३. या शासन निर्णयाद्वारे, दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ व दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१५ अन्वये गठीत केलेल्या उच्चस्तरीय समितीस या शासन निर्णयाच्या दिनांकापासून २ महिन्याची मुदतवाढ देण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१६०१०६१०५३५४३११० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vaijnath Bhujangrao Latake

Digitally signed by Vaijnath Bhujangrao Latake
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8502d8fbaa5d3d31358e5bf349fc0853019893b61049b2ad260bccf75c596136, cn=Vaijnath Bhujangrao Latake
Date: 2016.01.06 17:04:36 +05'30'

(वै. भू. लटके)
शासनाचे उप सचिव

प्रत :-

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री (वित्त आणि नियोजन) यांचे खाजगी सचिव
४. मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
५. मा. राज्यमंत्री (वित्त आणि नियोजन)
६. मा. राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
७. मा. मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.सचिव (लघु व मध्यम उद्योग) तथा पदसिध्द विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,मुंबई.
१२.डॉ. विनय सहस्त्रबुध्दे, १४५ साउथ एव्हेन्यू, नवी दिल्ली
१३.डॉ. गोपाल पालीवाल, हनी. वी. डेव्हलपमेंट, चर्मालय च्या मागे, गोपुरी, वर्धा.
१४.डॉ. सोहम पांड्या, ग्रामोपयोगी विज्ञान केंद्र, दत्तपूर, वर्धा
१५.श्री. अतुल शर्मा, सामुदायिक पॉलिटेकनिक, वर्धा
१६.श्री. प्रभाकर पुसदकर, नवी तालीम परिसर, सेवाग्राम, वर्धा
१७.श्री. अशोक शिंदे, माजी राज्यमंत्री, रिध्दी सिध्दी, गांधी वार्ड, हिंगणघाट, वर्धा.
१८. डॉ. आदर्श फत्तेसिंग गुर्जर, रा. हिंगणघाट, जिल्हा-वर्धा.
१९.श्री. सुनिल जोशी, “वेदा” भंडारा
२०.श्री. व्ही. गिरीराज (भा.प्र.से.), महाराष्ट्र शासन, मुंबई
२१.डॉ. ए. जी. राव, आय. आय. टी., मुंबई
२२.डॉ. शिरिष बेदारे, आय. आय. टी., मुंबई
२३. डॉ. प्रसाद वामन देवधर, मु.पो.झाराप, ता.कुडाळ, जिल्हा-सिंधुदुर्ग-४१६ ५२०.
२४.श्री. विकास आमटे, आनंदवन, वरोरा, चंद्रपूर
२५. आयुक्त (हस्तकला), भारत सरकार, नवी दिल्ली
२६. व्यवस्थापकीय संचालक (भा.प्र.से.), महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, मुंबई.

२७. संचालक, खादी व ग्रामोद्योग आयोग, मुंबई
२७. संचालक, सेंट्रल बी रिसर्च ट्रेनिंग इन्स्टिटट्युट, पुणे
२८. विभागीय आयुक्त, नागपूर.
२९. जिल्हाधिकारी, वर्धा.
३०. जिल्हा नियोजन अधिकारी, वर्धा.
३१. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई
३२. उप सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
३४. निवड संग्रह (उद्योग-६)